# मेळघाट विधानसभा मतदारसंघातील आदिवासी जमातीच्या उमेदवारांचे राजकीय सहभाग

**प्रा. डॉ. रमेश एम. राठोड** राज्यशास्त्र विभाग प्रमुख श्री. वसंतराव नाईक महाविद्यालय धारणी, जि. अमरावती

---

**राजकीय सहभागाचा अर्थ:-**

ग्रीक तत्वज्ञ ॲरिस्टॉटल असे म्हणतो की, "मनुष्य हा स्वभावत:च सामाजिक आणि राजकीय प्राणी आहे याचा अर्थ समाजात आणि राज्यात राहणे हा मानवी स्वभाव आहे"[१]. समाजात आणि राज्यात राहिल्याने व्यक्तीचे जीवन सुखी आणि समाधानी होते. मनुष्यप्राणी हा प्राचीन काळापासून राजकीय व्यवस्थेशी जुळलेला महत्वाचा घटक असल्यामुळे राजकीय प्रक्रीया ही लोकसहभागातून यशस्वी होऊ शकते परंतु व्यक्तीचा हा राजकीय व्यवस्थेतील सहभाग सर्वत्र सारखा असतो. तो जसा कमी अधिक प्रमाणपत्र मोजला जातो तसाच तो वेगवेगळया स्वरूपात सुध्दा असतो.

मनुष्य फार पूर्वीपासून आपला राजकीय सहभाग दर्शवित आला आहे. ग्रीक नगरराज्यामध्ये सर्व नागरीक राज्यकारभारात प्रत्यक्षपणे सहभागी होत असत. किंबहूना असा राजकीय सहभाग नागरिकांचे कर्तव्य मानले जात होते. "हेन्स इल्यून यांच्या मते, शासनाच्या निर्णयनिर्धारण प्रक्रियेत किंवा धोरण निर्मित प्रक्रियेत लोकांनी स्वत:ला गुंतवून घेणे म्हणजे राजकीय सहभाग होय"[२]. राजकीय सहभाग हा वेगवेगळया प्रकारचा असून मुख्यत: ऐच्छिक स्वरूपाचा असतो. त्यामुळे लोकशाही शासनाला स्थैर्य प्राप्त होते.

मतदान हा राजकीय सहभागाचा महत्वाचा घटक आहे. परंतु राजकीय सहभाग केवळ मतदाना पुरताच मर्यादीत नसतो. राजकीय सभा, समेंलने, चळवळी, राजकीय पक्षातील सहभाग, मंत्रीमंडळ यांसारख्या अनेक माध्यमाव्दारे व्यक्ती राजकारणात सहभागी होत असतो.राजकीय सहभागामुळे लोकशाही शासनात व्यक्तीला इच्छा आकांक्षाचे अविष्कार होवून त्या व्यक्त करण्यासाठी अनेक माध्यमांचा उपयोग करता येतो.

**राज्यविधीमंडळातील राजकीय सहभाग:-**

भारतात केंद्र प्रमाणेच घटकराज्यातही संसदीय शासन पध्दातीचा स्विकार केलेला आहे. प्रत्येक घटकराज्यात जबाबदार व संसदीय शासन पध्दतीचे मंत्रीमंडळ निर्माण काण्यात आले आहे. यामध्ये राज्यपाल नामधारी शासन प्रमुख असून मुख्यमंत्री आणि त्यांचे मंत्रीमंडळ हे वास्तविक शासन प्रमुख आहे.

"१९५६ सालच्या राज्यपुनर्रचना आयोगाच्या कायद्यानुसार घटकराज्ये आणि केंद्रशासित प्रदेश असे दोन प्राकर पाडण्यात आहे. त्यमध्ये घटकराज्याची आणि केंद्राची एक संविधान संपूर्ण भारतासाठी लागू होईल असे स्पष्ट करण्यात आले आहे"[३]. भारतीय"राज्यघटनेच्या कलम १६८ नुसार प्रत्येक घटकराज्यासाठी एका राज्यविधीमंडळाची तरतुद करण्यात आलेली आहे. राज्यसुचीतील विषयावर कायदे करण्याचा अधिकार राज्यविधीमंडळाला आहे"[४].

**मेळघाट विधानसभेतील आदिवासी जमातीच्या उमेदवाराचा राजकीय सहभाग:-**

राज्यघटनेच्या कलम १७० नुसार प्रत्येक घटकराज्यासाठी विधानसभा सभागृह निर्माण करण्यात आले. "संविधानाच्या ३३२ व्या कलमानुसार प्रत्येक घटकराज्याच्या विधानसभेच्या अनुसूचित जाती आणि जमातीसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात काही जागा राखीव म्हणून ठेवण्यात यावे असा घटनात्मक नियम आहे"[५]. महाराष्ट्र राज्यातील अमरावती लोकसभा मतदारसंघामध्ये मेळघाट विधानसभा मतदारसंघाचा समावेश होतो.

१९६७ पासून मेळघाट विधानसभा मतदारसंघ अनुसूचित जमातीसाठी(ST) राखीव ठेवण्यात आले. अमरावती लोकसभा मतदार संघात मेळघाट विधानसभा मतदारसंघ क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात मोठा मतदारसंघ म्हणून ओळखला जातो. यामध्ये धारणी, चिखलदरा व अचलपुर तालूक्याचा काही भागाचा समावेश होते.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर महाराष्ट्राची पहिली विधानसभेची निवडणूक १९६२ मध्ये घेण्यात आली. १९६२ पासुन १९६७ पर्यंत मेळघाट विधानसभा मतदारसंघ खुल्या प्रवर्गात होता तो पर्यंत या मतदारसंघाचे नेतृत्व अचलपूर तालुक्याकडेच होते. मामराज खेडेलवाल आणि कोकिलाताई गावंडे यांनी या मतदारसंघातून पुर्वी आमदारकी उपभोगली १९६७ मध्ये हा मतदार संघ अनुसूचित जमातीसाठी राखीव होताच भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे दयाराम पटेल हे प्रथम आदिवासी आमदार बनले. त्यांना मंत्रीपद ही लाभले परंतु अडीच वर्षाच्या अल्पकाळातच त्यांना देवाज्ञा झाली व रामु पटेल यांची अविरोध निवड करण्यात आली. त्यानाही मंत्रीपद बहाल करण्यात आले.

१९७२ व १९७८ च्या निवडणुकीत रामु पटेल यांनी काँग्रेस पक्षाचे नेतृत्व केले. त्यांच्या कार्यकाळात पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी धारणीत सभा घेवून मेळघाट भारावून टाकले आणि मेळघाटातील आदिवासी लोक इंदिराजीसह पंजाशी एकरूप झाले. १९८० मध्ये काँग्रेसचे नारायण पटेल विजयी झाले. ते दयाराम पटेल यांचे सख्ये भाऊ होते. १९८५ मध्ये काँग्रेस पक्षाने रामू पटेल यांना संधी दिली व ते विजयी झाले मात्र १९९० मध्ये पहिल्यांदाच काँग्रेस पक्षाने चिखलदरा तालुक्याला संधी दिली. तुळशीराम काळे उर्फ तु. रू. काळे यांनीही मेळघाटातील काँग्रेसचे गड कायम राखला. शिवसेनेचे रमेश राईकवार यांचा त्यांनी पराभव केला. यावेळी सर्वात जास्त १२ उमेदवार रिंगणात होते.

१९९५ मध्ये काँग्रेस पक्षात फुट पडली. कॉग्रेसने तु. रू. काळे यांना उमेदवारी दिल्यामुळे रामू पटेल यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढविली मेळघाटात पहिल्यांदाच कोणत्याही अस्तित्व नसतांना भाजपाने स्वत:चे खाते उघडले भारतीय जनता पक्षाचे पटल्या मावस्कर उर्फ पटल्या गुरूजी हे भाजप-सेना युतीच्या काळात विजयी झाले. यावेळी बसपातर्फे दयाराम पटेल यांचे चिरंजीव राजकुमार पटेल

यांनी निवडणुक लढवीत दुसऱ्या क्रमांकाचे मत प्राप्त करून सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. अपक्ष उमेदवार रामू पटेल यांना तिसऱ्या क्रमांकाचे तर काँग्रेसचे तु. रू. काळे यांना चवथ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले.

१९९९ ते २००४ या कार्यकाळात भाजप पक्षाचे उमेदवार राजकुमार पटेल विजयी झाले. सन २००९ मध्ये भाजप पक्षात अंतर्गत वाद उफळून आला भाजप पक्षातील दुसऱ्या गटाने अपक्ष म्हणून रवी पटेल यांना मैदानात उतरविले तर काँग्रेसने पुन्हा चिखलदरा तालुक्याला संधी देत तु. रू. काळे यांचे चिरंजीव केवलराम काळे यांना उमेदवारी दिली. राजकुमार पटेल यांचा विजय भाजपातर्फे निश्चित मानला जात असतांना केवलराम काळे अवघ्या ७९० मतांनी राजकुमार पटेल यांचा पराभव करीत काँग्रेसचा १५ वर्षाचा वनवास संपविला[६].

२०१४ मध्ये राजकुमार पटेल यांना अतर्गत कलह या कारणामुळे भाजप पक्षाला सोडचिठ्ठी देवून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यामुळे भाजपाकडे निवडणुक रिंगणात कोणाला उतरावे असा प्रश्न निर्माण झाला. यावेळी पंचायत समिती सदस्य प्रभुदास भिलावेकर यांनाभाजपाने उमेदवारी बहाल केली. या निवडणुकीच्या प्रचारासाठी नितीन गडकरी आणि शिवराजसिंग चव्हाण हे प्रभुदास भिलावेकर यांच्या प्रचारासाठी धारणीत आले. तरीपण राजकुमार पटेल यांचा विजय निश्चित मानला जात असतांना सुध्दा मोदी लाट म्हणून मेळघाटातील मतदारांनी भारतीय जनता पक्षाचे प्रभुदास भिलावेकर यांना निवडून दिले.

२०१९ मध्ये भाजपाचे प्रभुदास भिलवेकर यांना उमेदवारी न देता पटल्या गुरूजी यांचे चिरंजीव रमेश मावस्कर यांना उमेदवारी दिली. यावेळी केवलराम काळे यांनी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देवून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यामुळे त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसनी उमेदवारी दिली या निवडणुकीत राजकुमार पटेल यांना कोणत्याही पक्षाची उमेदवारी मिळावी म्हणून आतोनात प्रयत्न केले. परंतु त्यांना कोणत्याही राजकीय प्रक्षाने उमेदवारी दिली नाही. त्यामुळे बच्चुभाऊ कडु यांच्या प्रहार पक्षाच्या वतीने उमेदवारी मिळाली. या निवडणुकीमध्ये प्रहारचे राजकुमार पटेल यांनी भाजप पक्षाचे उमेदवार रमेश मावस्कर यांचा ४१३६२ मतांनी पराभव केला. आणि प्रथमच महाराष्ट्र राज्य विधिमंडळात प्रहारचे दोन आमदार विजयी झाले.

**मेळघाळ विधानसभा (१९६२ ते २०१९) विजय झालेले उमेदवार व त्यांचा पक्ष**

| अ.क्र. | वर्ष | विजयी उमेदवार | पक्ष |
|---|---|---|---|
| १ | १९६२ | मामराज जगनाथ खंडेलवाल | अपक्ष |
| २ | १९६७ | दयाराम नानु पटेल | काँग्रेस |
| ३ | १९६८ | रामु म्हातंग पटेल | काँग्रेस |
| ४ | १९७२ | रामु म्हातंग पटेल | काँग्रेस (आय) |
| ५ | १९८० | नारायण नानु पटेल | काँग्रेस |
| ६ | १९८५ | रामु म्हातंग पटेल | काँग्रेस |
| ७ | १९९० | तुळशीराम रूपला काळे | काँग्रेस |
| ८ | १९९५ | पटल्या लंगड्या मावस्कर | भाजप |
| ९ | १९९९ | राजकुमार दयाराम पटेल | भाजप |
| १० | २००४ | राजकुमार दयाराम पटेल | भाजप |
| ११ | २००९ | केवलराम तुळशीराम काळे | काँग्रेस |
| १२ | २०१४ | प्रभुदास भिलावेकर | भाजप |
| १३ | २०१९ | राजकुमार दयाराम पटेल | प्रहार जनशक्ती पार्टी |

वरील सापणीवरून असे दिसून येते की, १९६२ ते २०१९ या कालखंडात मेळघाट विधानसभेचे एकूण १३ निवडणूका झाल्या यापैकी १९९० पर्यंत काँग्रेस पक्षाचे उमेदवार विजयी झालेले दिसून येते. यानंतर सलग १५ वर्ष भाजप पक्षाने अधिराज्य गाजवले. अर्धापेक्षा जास्त वेळा काँग्रेस पक्षाने म्हणजे १३ पैकी ७ वेळा उमेदवार विजयी झाले. त्यानंतर ४ वेळा भारतीय जनता पार्टीचे उमेदवार विजयी झाले. २०१९ मध्ये पहिल्यांदा प्रहार जनशक्ती पार्टीने आपला उमेदवार निवडून आला. यामध्ये शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने खाते उघटले नाही.

या निवडणुकीमध्ये सातपुड्याच्या कुशीत, दऱ्या, डोंगर कपाशित राहणारा अशिक्षीत, अडाणी, गरीब असलेला आदिवासी जमातीचा आमदार म्हणून राजकीय सहभाग हा सुशिक्षीत, सुसंस्कृत व प्रगत समजल्या जाणाऱ्या लोकांपेक्षा जास्त होता.

**संदर्भ सुची:-**


१. घांगरेकर चि. ग. मेहता श्रुती उदय, राजकीय समाजशास्त्र दत्तसन्स प्रकाशन नागपूर, २०००, पृ.क्र. १२०

२. देशमुख अलका आणि गोरे संजय, तुलनात्मक शासन आणि राजकारण श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर, २०१२, पृ. क्र. ३२२

३. उ. नि. घांगरेकर चि. ग. पृ. क्र. १०१

४. जैन अशोक, महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, पृ.क्र.५५

५. उ. नि. घांगरेकर चि. ग., पृ. क्र. २०९

६. श्यामकांत पाण्डे (तालुका प्रतिनिधी) दैनिक लोकमत, दि. २०१२ सप्टेंबर २०१२